# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथील स्टेट बँकेच्या शाखेकडून पीक कर्जाचे वाटप करण्याबाबत**

**(१) ३१९७७ (२७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथील स्टेट बँकेच्या शाखेकडून पीक कर्जाचे वाटप करण्यास टाळाटाळ होत असल्याने संग्रामपूर तहसिल कार्यालयात शेतकऱ्यांनी तहसिलदारांना दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेराव घातला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्जाचे वाटप करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१९) :** (१) होय.
(२) संबंधित प्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा संग्रामपूर च्या शाखाधिकारी यांना तहसिल कार्यालय, संग्रामपूर येथे बोलावून उपस्थित शेतकऱ्यांसमोरच तात्काळ पिक कर्ज वाटपाच्या सुचना देण्यात आल्या व त्यानुसार संग्रामपूर तालुक्यात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संग्रामपूर व सोनाळा शाखेमार्फत दिनांक २४.०२.२०१६ अखेर १६५९ एवढ्या खातेदारांना रु.११,५७,४३,६८०/- एवढे कर्ज वाटप केलेले आहे. तद्नंतर पिक कर्ज वाटपासंबंधी एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूम व वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये वीजनिर्मिती करीता शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्याबाबत**

**(२) ३५७३० (२३-१२-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम व वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये वीजनिर्मिती करीता विंड वर्ल्ड इंडिया या कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी घेवून सुध्दा एकही युनीट वीजनिमिर्ती आजपर्यंत झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अद्याप बऱ्याच शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत वीजनिर्मिती झाली नसून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नसल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांना परत द्या अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०४-२०१९) :** (१) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिलेल्या अहवालानुसार मे.विंड वर्ल्ड इंडिया लि. या खाजगी कंपनीने सन २०१३ पासून औद्योगिक प्रयोजनार्थ वीज निर्मितीसाठी जमिनी कराराव्दारे व खरेदी खताच्या आधारे खरेदी केलेल्या आहेत.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) नमूद गावातील शेतक-यांना जमिनीची खरेदी किंमत कंपनीकडून मिळालेली नाही, म्हणून जमीन परत मिळावी अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद कार्यालयाने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गांधीनगर, सागरशेत (ता.तलासरी, जि.पालघर) येथील जमिन मालक/कुळांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३) ३६७०९ (१६-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गांधीनगर, सागरशेत (ता.तलासरी, जि.पालघर) येथील जमिनीतून पॉवर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडीया लि. यांची उच्च दाबाची विद्युत लाईन गेल्याने जमिन मालक/कुळांना अद्याप नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनाक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.मंत्री पुनर्वसन व मदत कार्य यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०४-२०१६) :** (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीने एकूण १०६ बाधित शेतकऱ्यांपैकी ९७ शेतकऱ्यांना, कृषिपिके / फळझाडांच्या नुकसान भरपाईपोटी रु. ८३,२४,५५०/- अदा केले आहेत. उर्वरित ५ बाधितांना मंडळ अधिकारी तलासरी यांचेकडील दि.२६ .०६. २०१४ रोजीच्या मुल्यांकन अहवालानुसार नुकसान भरपाई देणेबाबत दि.२५.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच ४ बाधित शेतकऱ्यांनी, त्यांना दिलेली नुकसान भरपाईची रक्कम कमी असल्याच्या कारणास्तव ती नाकारली आहे. तसेच वनझाडांच्या नुकसानबाधित एकूण ८२ शेतकऱ्यांपैकी ७९ शेतकऱ्यांना वनझाडांच्या नुकसान भरपाईपोटी रु. २,४६,६२,६२६/- देण्यात आली असून ३ बाधित शेतकऱ्यांनी वनझाडांच्या नुकसान भरपाईची रक्कम स्विकारण्यास नकार दिला आहे. तसेच घरांच्या नुकसान भरपाईपोटी १ घर बाधितानी रु.११,७०,४८४/- एवढी रक्कम स्विकारण्यास नकार दिला आहे.

---

**राज्यातील पेसा कायद्यातील त्रासदायक तरतुदी कमी करण्याबाबत**

**(४) ५६६८४ (११-०८-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षापासून पेसा कायद्यान्वये १०० टक्के पदे भरण्यात यावीत असे आदेश शासनाने देऊनही कायद्यातील तरतूदी त्रासदायक असल्याने कर्मचारी रिक्त पदांचा अनुशेष मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेसा कायद्यातील त्रासदायक तरतुदी कमी करुन पूर्ण क्षमतेने पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही. नियमानुसार पदभरती सुरु आहे.

(२) व (३) अनुसूचीत क्षेत्रातील निर्देशीत १७ संवर्गाची रिक्त पदे भरतांना दरवर्षी एकूण रिक्त पदांच्या २०% पदे भरण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील पदभरतीला मा.मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील लोकमंगल ॲग्रो या कंपनीने साखर कारखान्यासाठी गुंतवणूकदारांकडून जमा केलेली गुतंवणूक सेबीच्या नियमाविरुध्द असल्याबाबत**

**(५) ६९९५२ (२७-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील लोकमंगल ॲग्रो या कंपनीने साखर कारखान्यासाठी ४ हजार ७५१ गुंतवणूकदारांकडून जमा केलेली तब्बल ७४,८२ कोटी रूपयांची गुंतवणूक सेबीच्या नियमाविरुध्द असल्याने ही रक्कम शेतकऱ्यांना सव्याज परत करण्याचे आदेश सेबीने दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, या चौकशीनुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

लोकमंगल ॲग्रो कंपनी ही केंद्र शासनाच्या कंपनी कार्य विभागामार्फत कंपनी रजिस्ट्रार यांनी कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणी केलेली आहे. सदर खाजगी कंपनीच्या गुंतवणूकी, शेअर्स इत्यादी बाबी राज्य शासनाशी संबंधित नसून सेबीशी (SEBI) संबंधित आहेत. सेबी ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

---

**आदिवासी टोकरे कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्रांबाबत**

**(६) ७२४३६ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी टोकरे कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्रांच्या अडचणी सोडविणेबाबत एक बैठक घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१५, दिनांक १० मार्च, २०१६ व दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार आतापर्यंत बैठक घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी टोकरे कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०४-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच अधिनियमाच्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी ही संबंधित अर्जदारावर आहे. अनुसूचित जाती/जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यास येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सूचविण्यासाठी दिनांक १४ जानेवारी,२०१९ च्या शासन निर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे.

---

## वाशीम कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील गोदाम व व्यापारी संकुलाचे नियमबाह्य वाटप केल्याबाबत

**(७) ७५३८८ (२१-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खरेदी केलेले धान्य ठेवण्यासाठी गोदामाची मागणी करुनही ते उपलब्ध करुन न दिल्याने झालेल्या तक्रारीवरुन जिल्हा उपनिबंधकांनी १७ संचालकांना बरखास्त करुन प्रशासक नेमल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती परिसरातील गोदाम व व्यापारी संकुले यांचा नियमानुसार लिलाव न करता वाटप केल्याचा आरोपही करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी संचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०३-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

(४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनीयमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५ (१) नुसार कार्यवाही करून संचालक मंडळ बरखास्त करण्यात येऊन प्रशासकाची नेमणूक करण्यात आली होती. परंतु त्यानंतर शासनाच्या आदेशान्वये वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीवर अशासकीय प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांच्या गैरव्यवहाराबाबत**

**(८) ८००७० (२१-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गैरव्यवहार केलेल्या बाजार समित्यांच्या दोषारोपासह पुढील कारवाईची शिफारस करणारा सुस्पष्ट अहवाल जिल्हा उपनिबंधकानी सादर करावा असे स्पष्ट आदेश मा.राज्यमंत्री, कृषी फलोत्पादन व पणन यांनी दिले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यमंत्री यांच्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधकानी आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने गैरव्यवहार केलेल्या बाजार समित्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०३-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील “अ” भागात नमूद आर्थिक गैरव्यवहार, अनियमितता व गंभीर दोषांबाबत संबधितांविरूध्द कोणती कायदेशीर केली याबाबतचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी जिल्हा विशेष लेखा परिक्षकांकडून मागितला होता. याबाबत स्वतंत्रपणे चौकशी होणे आवश्यक असल्यामुळे कलम ४० नुसार चौकशीचे आदेश दिनांक २६.०८.२०१५ रोजी देण्यात आले होते.

नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीने या आदेशाविरूध्द मा.मंत्री (पणन) यांचेकडे अपिल केले होते. सदरचे अपिल फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरूध्द बाजार समितीने मा.उच्च न्यायालयात मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१९६५/२०१६ दाखल केली आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे चौकशीबाबतची कार्यवाही प्रत्यक्षात सुरू झाली नाही.

याच लेखापरिक्षण अहवालातील आर्थिक गैरव्यवहार, अनियमितता व गंभीर बाबीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयाकडे फिर्याद दाखल केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहेज (गुजरात) ते नागोठणे (महाराष्ट्र) या इथेन वायूवहन (गॅस) प्रकल्पाच्या पाईपलाईनला शेतकऱ्यांनी केलेला विरोध**

**(९) ८२२०९ (२१-०४-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेज (गुजरात) ते नागोठणे (महाराष्ट्र) या इथेन वायूवहन (गॅस) प्रकल्पाच्या पाईपलाईन टाकण्याचे काम रिलायन्स कंपनीकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इथेन वायूवहन पाईपलाईन ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतातून जात असल्याने शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करुन सुध्दा रिलायन्स कंपनीने पोलीस बळाचा वापर करुन पोलिसांकडून तसेच गुंडांकरवी धमकावण्याचे प्रकार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदरची बाब संपादन संस्थेशी संबंधित आहे. त्यांचेकडील पत्र क्र. दिनांक २०/०५/२०१७ नुसार ठाणे जिल्हयातील भिवंडी, कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील गावांमधील जमीनीत प्रकल्पाची पाइपलाईन टाकणेचे काम सुरु आहे. त्यावेळी काही गावांत काही गावगुंडांनी कर्मचाऱ्यांना मारहाण करुन यंत्र सामुग्रीची नासधुस करुन प्रकल्पाच्या कामात अडथळा निर्माण केल्याच्या घटना झाल्या आहेत. सदर गावगुंडाविरुध्द संबधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने तसेच यंत्र सामुग्रीच्या संरक्षणासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून सदर क्षेत्रात आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक बाजार समितीमध्ये व्यापा-यांकडून बाजारसेस वसुल करण्यात येत असल्याबाबत**

**(१०) ८३०७९ (२१-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक बाजार समितीमार्फत व्यापा-यांकडून नाक्यावर गाड्या रोखून बाजारसेस वसुल करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार व्यापा-यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) यासंबंधात मा.मंत्री (पणन) यांच्या अध्यक्षतेखाली दि.६.१०.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली. बैठकीस बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील व्यापारी, बाजार समितीचे सभापती, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक व पणन संचालक, पुणे हे उपस्थित होते. या बैठकीतील निर्णयानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी बाजार समितीला नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

---

**सांगली जिल्हयातील एमआयडीसीअंतर्गत भूखंड वितरीत केलेल्या भूखंडधारकांना मुलभूत सुविधा मिळण्याबाबत**

**(११) ८८१८५ (१८-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाअंतर्गत भूखंड वितरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वितरीत केलेल्या भूखंडधारकांना एमआयडीसीने मुलभूत सुविधा उपलब्ध न केल्यामुळे भूखंडधारक स्वखर्चाने सुविधा उपलब्ध करून प्रकल्प सुरू करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वितरीत केलेले भूखंडमालक बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेवून सुविधा उपलब्ध नसल्याने भूखंड विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वखर्चाने भूखंडधारक सुविधा उपलब्ध करून प्रकल्प उभारणीचा प्रयत्न करणाऱ्या भूखंडधारकांना विरूद्ध एमआयडीसी दंडात्मक आकारणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सांगली जिल्हयातील विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा अंतर्गत डांबरी रस्ते, पाणी पुरवठा, दिवा बत्ती व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच शिराळा औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी १६२.८० हे. आर जमीन संपादित करण्यात आली असून, भूखंड धारकांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी मोरणा धरण येथे जॅकवेल बांधलेले आहे.

तसेच ३.०० द.ल.लि./दिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र व अशुध्द पाणी पुरवठा जलवाहिनी टाकण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

सांगली जिल्हयामध्ये महामंडळाची एकूण ११ औद्योगिक क्षेत्रे असून त्यापैकी ९ औद्योगिक क्षेत्रांना पायाभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. उर्वरित २ औद्योगिक क्षेत्रांना पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथवर आहे. सदर औद्योगिक क्षेत्रातील कोणत्याही भुखंडधारकांने महामंडळास स्वखर्चाने पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी परवानगी मागितलेली नाही. त्यामुळे भूखंडधारकांने स्वखर्चाने सुविधा उपलबध करून प्रकल्प उभारण्याचा प्रश्न उद्भवत नाही व तसेच भूखंडधारकांवर महामंडळाकडून दंडात्मक आकारणी करण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोली आणि गोकुळ शिरगाव (जि.कोल्हापूर) प्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (बीसीसी) न घेतल्याने नोटीस बजावल्याबाबत

**(१२) ८८२८९ (१८-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोली आणि गोकुळ शिरगाव (जि.कोल्हापूर) येथील औद्योगिक विकास महामंडळाने फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरच्या प्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (बीसीसी) घेतला नसल्याने सुमारे ६५ लाख रूपयांची नोटीस बजावली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मे कोल्हापूर फौंड्री ॲन्ड इंजिनियरींग क्लस्टर यांना शिरोली व गोकुळ शिरगाव औद्योगिक क्षेत्रातील त्यांचे भूखंडांना नोटीस बजावण्यात आली नसून प्रथम मुदतवाढ शुल्क अदा करणेबाबतचे पत्र दिलेले आहे. तदनंतर, भूखंडधारकाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांचा प्रकल्प केंद्र शासनाच्या IIUS योजनेंतर्गत मंजूर झालेला असल्याने व केंद्र शासनाच्या PPP तत्वावर उभारणी होत असून SPV माध्यमातून अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबींचा विचार करून सदर मुदतवाढ शुल्क माफ करून त्यांना दोन वर्षाच्या कालावधीसाठी विना शुल्क मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) सर्व्हे नं.४७१/१ ते ४७१/५ चे क्षेत्र भूसंपादनातून वगळण्याबाबत**

**(१३) ९०९३० (१८-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ गडहिंग्लज परिक्षेत्र भूसंपादन क्षेत्र सर्व्हे नं. ४७१/१ ते ४७१/५ चे क्षेत्र भूसंपादनातून वगळणेबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा. उद्योगमंत्री यांनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महामंडळ स्तरावर जमीन वगळणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

---

**मेक इन नाशिक चे प्रस्ताव जमिनीअभावी प्रलंबित असल्याबाबत.**

**(१४) ९६५५६ (०४-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणुक करण्याच्या उद्देशाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुंबईत झालेल्या मेक इन नाशिक या कार्यक्रमात ३९ उद्योगांनी २१०० कोटीचे प्रस्ताव एमआयडीसीला सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उदयोगांना अपेक्षित २५० एकर जागा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याने जमिनीअभावी हे प्रस्ताव अडगळीत आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास राज्यात औद्योगिक गुंतवणुक यावी याकरिता शासनाने विदेशी आणि परराज्यातील उद्योगांसाठी रेड कार्पेट अंथरत असताना दुसरीकडे मात्र सर्वप्रकारच्या क्षमता असतानाही नाशिककडे कुठल्याही औद्योगिक गुंतवणुकीचा ओघ वळविला जात नाही, हेही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०३-२०१९) :** (१) खरे आहे.

(२) मेक इन नाशिक हा कार्यक्रम NIMA (Nashik Industrial & Manufactureres Association) उद्योजकांच्या संघटनेमार्फत दिनांक ३० व ३१ मे २०१७ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला होता.

सदरहू कार्यक्रमात ४४ उद्योजकांसोबत कार्यान्वित केलेल्या MoUची यादी NIMA यांनी दिनांक ११/१०/२०१७ रोजी महामंडळास सादर केली आहे. त्यापैकी ३२ उद्योजकांनी सातपूर/अंबड या औद्योगिक क्षेत्रातून भूखंड वाटपाची मागणी केली आहे. सातपूर या औद्योगिक क्षेत्रात एकही भूखंड वाटपास उपलब्ध नाही. अंबड औद्योगिक क्षेत्रात केवळ ४ भूखंड वाटपास उपलब्ध असून त्यास उद्योग विस्तारासाठी उद्योजकांची मागणी प्राप्त झाली आहे. उर्वरित १२ पैकी ३ उद्योगांनी अति.मालेगांव, सिन्नर, विंचुर वाईन पार्क येथून मागणी केलेली असुन महामंडळाच्या धोरणानुसार याठिकाणाहून भूखंड वाटपाची जाहीरात प्रसिध्द करुन भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

अति. दिंडोरी औद्योगिक क्षेत्रासाठी २५९.२६ हे.आर इतक्या क्षेत्राचे संपादन करण्यात आलेले आहे. सदर क्षेत्राचा आराखडा मंजूर झालेला असून भूखंडाचे सिमांकनाचे काम सुरु आहे. सदर ठिकाणी लहान-मोठ्या आकाराचे एकुण ७१ भूखंड आरेखीत करण्यात आलेले आहेत. तसेच रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा इ. पायाभूत सुविधांची कामे प्रगतीपथवार आहेत. सदर कामे पुर्ण झाल्यानंतर सदर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड ऑनलाईन पध्दतीने वाटपास उपलब्ध केले जाणार आहेत.

(३), (४) व (५) मागास व अविकसित भागात उद्योग यावेत याबाबत शासन/महामंडळामार्फत सतत प्रयत्न करण्यात येतात. तथापि, उद्योग उभारणीच्या बाबतीत संबंधीत उद्योजकाचा निर्णय अंतिम असतो. त्यामुळे त्यांची गरज / प्राधान्य विचारात घेता भूखंडाचे वाटप करणे क्रमप्राप्त ठरते.

---

## कोल्हापूर जिल्हयात अपंग कल्याण योजनेची रक्कम समाजकल्याण विभागाकडे अखर्चित राहिल्याबाबत

**(१५) ९८००२ (०६-०१-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अपंग कल्याण योजनेच्या विविध सुविधांसाठीचे सुमारे ६१ लाख रुपये समाजकल्याण विभागाकडे अखर्चित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्हयातील अपंगाच्या कल्याणकारी सुविधांची सर्व कामे ठप्प झाली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०४-२०१९) :** (१) व (२) खरे नाही, सिप्डा योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडुन कोल्हापुर जिल्हयासाठी ६१,४१,४५७ रू. इतका निधी प्राप्त झाला होता. त्यामधून विविध कामावर ४२,९३,००० रू. इतका निधी खर्ची टाकण्यात येवून शिल्लक रू.१८,५२,१५७ इतकी रक्कम केंद्र शासनाकडे परत करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**हिंजवडी (जि.पुणे) येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने गवारेवाडीसाठी स्मशान भूमी तसेच इतर मुलभूत गरजांची पुर्तता करुन देण्याबाबत**

**(१६) ९९०७४ (०३-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (जि.पुणे) येथील आयटी नगरी म्हणून ओळखल्या शहरात तरुणाचा अंत्यविधी जागेअभावी हिंजवडी आयटी पार्कच्या भर रस्त्यावर दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारात करण्यात आला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंजवडी आयटीच्या तिसऱ्या टप्प्याजवळ गवारेवाडी, मान या लोकवस्तीतील शेकडो एकर जमीन महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामंडळाने संपादीत केली आहे. हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गवारेवाडीसाठी स्वतंत्र स्मशान भूमीची सोय नसल्याने व इतरही अनेक मुलभूत गरजांची पुर्तता महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने केली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०२-२०१९) :** (१) याबाबत वृत्तपत्रामध्ये दि.८/७/२०१७ रोजी बातमी आलेली होती. तथापि, सदर घटना जागेअभावी घडलेली नाही.
(२) राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ साठी मौजे माण येथील ३५१.१७५० हे. आर क्षेत्र संपादन करणेत आलेले आहे.
(३ व (४ मौजे माण भोईरवाडी येथील ग्रामपंचायतीसाठी म.औ. वि. महामंडळामार्फत स्मशान भूमीसाठी भूखंड क्र. P-२ क्षेत्र ६०० चौ. मी. व भूखंड क्र. AMRH -१५ क्षेत्र १००० चौ. मी. वाटप करणेत आलेले आहे. भूखंडाचा ताबा दि. २४/११/२०१० रोजी दिलेला असून ग्रामपंचायत यांचे मागणीनुसार पुनश्च दि. ११/४/२०१७ रोजी भूखंडाची पुनर्मोजणी करून देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर, वर्धा, बुलढाणा या तीन जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह बँकेत नागरिकांना एफ.डी.ची रक्कम परत मिळण्याबाबत**

**(१७) १०१२०५ (०६-०१-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, वर्धा, बुलढाणा या तीन जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह बँकेत नागरिकांनी मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नकार्यासाठी, आजारपणासाठी फिक्स डिपॉझिट (एफ.डी.) ची रक्कम जमा केली असून, सदर एफ.डी.ची रक्कम मुदत संपल्यानंतरही त्यांना नियमानुसार परत करण्यात येत नसल्याबाबतची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर को-आपरेटिव्ह बँकेने एफडीची रक्कम संपल्यानंतरही सन २०१२ पासून रक्कम न देता मागील वर्षापासून फक्त ५ टक्के पैसे परत करीत आहे तसेच अशा पद्धतीने पैसे परत केल्याने नागरिकांना आपली पूर्ण रक्कम मिळण्यास १० ते १५ वर्षाच्या कालावधीपर्यंत वाट पाहावी लागत असल्याने त्यांच्या मनात भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून नागरिकांना त्यांची रक्कम परत करण्याबाबत निर्णय घेऊन योग्य ती व्यवस्था करण्याची व नागरिकांना न्याय देण्याची मागणी केली हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०४-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

मे, २०१४ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने नागपूर, बुलढाणा व वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी (जिमस) बँकांचा बँकींग परवाना मिळविण्याचा अर्ज नाकारुन संपूर्ण बँकींग व्यवहारास निर्बंध घातल्याने मे, २०१४ ते मार्च, २०१६ पर्यंत ठेवीदारांच्या खात्यावरील व्यवहार संपूर्ण बंद होते. परवाना प्राप्त करण्यासाठीच्या अटीची पुर्तता केल्यावर त्यांना परवाना प्राप्त झाला असून उपरोक्त बँकांचे व्यवहार पुनःश्च सुरु झाले असून अशा बँकांच्या प्राधिकृत अधिकारी समितीने ठेवी परताव्या बाबतचे खालील प्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

१. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मुदत पुर्ण झालेल्या ठेवीदारांना बचत ठेव व चालू ठेव खात्यातील रक्कम अनुक्रमे त्रैमासिक रु. ५०००/- व रु. १०,०००/- परत देण्याचे धोरण निश्चित केलेले आहे तसेच मुदत ठेवीवर किमान ८०% कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

२. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्राधिकृत समितीने वेळोवेळी ठरलेल्या धोरणानुसार बचत ठेवीच्या २५ % किंवा जास्तीत जास्त रु. ७५,०००/- टप्प्याने देण्यात आले आहेत.

३. दि बुलढाणा जिल्हा केंद्रिय सहकारी बँक मर्या. बुलढाणा या बँकेमार्फत दुर्धर आजार, पाल्याचे लग्न, कुटूंबातील आजार यासाठी ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ परत करण्यात येतात.

तसेच, मोठया ठेवीदारास किमान रु. ५ लाखाच्या ठेवी असल्यास ठेवीच्या ३०% रक्कम त्वरीत परत करण्यात आलेल्या आहेत. तसेच ज्यांच्या मुदत ठेवींची मुदत होणे बाकी आहे अशा ठेवीदारांना एकूण ठेवीच्या ७० ते ८० % रक्कम मुदत ठेव तारण कर्जसुद्धा दिलेले आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी तिनही बँकांवर शासन नियुक्त प्राधिकृत समिती नियुक्त असून समितीने वेळोवेळी केलेल्या ठरावानुसार ठेवीदारांच्या ठेवी देण्याची कार्यवाही बँक स्तरावर सुरू असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील भेल प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(१८) १०१३३० (०३-०१-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)) भंडारा जिल्ह्यात भारत सरकारचा महात्वाकांशी भेल प्रकल्पासाठी मुंडीपार, बामणी, खैरी येथील शेतकऱ्याची जमीन संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पामुळे हजारो बेरोजगार तरुणांना व भूमिहीन झालेल्या शेतकऱ्याचा कुटुंबातील एका व्यक्तीला रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प सुरु न झाल्यामुळे व शेतकऱ्यांची जमीन संपादित केल्यामुळे तसेच त्यांना कोणताच रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विहित मुदतीस प्रकल्प सुरु झाले नसल्यास संपादित करण्यात आलेली शेतजमीन शेतकऱ्यांना परत करण्याचे प्रावधान भूसंपादन कायद्यात असल्याने शेतकऱ्यांना त्यांची जमीन परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.

मौजा मुंडीपार, बाम्हणी व खैरी येथील १८८.९५ हे. आर. खाजगी जमीन संपादित करण्यात आलेली आहे.

(२) जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली व इतर उपस्थित पदाधिकारी यांचे समवेत दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी झालेल्या भेल प्रकल्पाच्या बैठकीमध्ये रोजगाराची एकत्रित नुकसान भरपाईची रक्कम ५.०० लक्ष रुपये प्रती कुटुंब, उत्पन्नाचे नुकसानबद्दल मदत शासन निर्णय १७/०४/२००६ मधील किमान कृषि धोरणानुसार रुपये १२०/- प्रती दिन याप्रमाणे जास्तीत जास्त ७५० दिवसांकरिता प्रतीकुटुंब पुनर्वसन, मदत, वाहतुक व पुनर्वसन भत्ता रुपये १००००/- प्रती कुटुंब असे एकूण ६.१० लक्ष आपसी वाटाघाटीने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) मऔवि अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार Pass through पध्दतीने भेलचे विनंतीनुसार जमीन संपादित करुन १८८.१० हे आर. जागेचा ताबा भेल यांना देण्यात आलेला आहे.
(४) व (५) सदरची जमीन मऔवि अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार भेलच्या खर्चाने संपादित करण्यात आलेली असल्यामुळे संपादित जमीन शेतकऱ्यांना परत करण्याची तसेच प्रकल्प सुरु करणेची बाब भेलशी निगडीत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील खनिज विकास निधी अंतर्गत उर्वरित निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**(१९) १०१४७८ (०४-०१-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील खनिकर्म विकास संचालनायलातर्फे सन २०१५-१६ मध्ये खनिज विकास निधी अंतर्गत १ कोटी ४१ लाख रुपयांची ग्रामपंचायत अंतर्गत कामे मंजूर होवून १०% निधीची तरतूद करण्यात आली होती, मात्र उर्वरित निधीचे वितरण विभागाकडे निधी नसल्याने कारण सांगून टाळण्याचे काम सुरू असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी चौकशी केली असता ९१७ कोटी रुपयांची पुरवणी मागणी खनिकर्म विभागाकडून अर्थसंकल्प कक्षाकडे मागणी करण्यात आल्याने निधीची तरतूद होण्याबाबत अद्याप शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कामांना निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०४-२०१९) : (**१), (२) व (३) जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतर यापूर्वीचा महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियम,२००१ निरसित करण्यात आला आहे. दि.१.९.२०१६ नुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेमधील प्रत्यक्ष खानबाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरित कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खान बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. अशी तरतूद करण्यात करण्यात आलेली आहे.

शासनपत्र दि. १७.४.२०१८ अन्वये खनिज विकास निधी अंतर्गत मंजूर प्रकल्प/विकास कामे जिल्हा खनिज प्रतिष्ठान मार्फत उपलब्ध निधीतून पुर्ण करण्याचे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर, वाडा (जि.पालघर) येथून रिलायन्स गॅस पाईपलाईन लि.कंपनीकडून पाईप टाकण्याचे काम सुरु असल्याबाबत**

**(२०) १०१७६५ (१३-०७-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी, डहाणू, पालघर, वाडा (जि.पालघर) तसेच गुजरातसह देहेज ते नागोठणे दरम्यान इथेन पाईपलाईनसाठी रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. कंपनीकडून पाईप टाकण्याचे काम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गॅस पाइपलाईनमधील दुरुस्ती तसेच नियंत्रणासाठी मुंबई-अहमदाबाद हायवेलगत पालघर तालुक्यात मौजे बऱ्हाणपूर येथे गट कमांक ३०३ खाते १२३ या आदिवासी खातेदारांच्या नावे असलेल्या भूखंडावर पाईपलाईनच्या एम एल व्ही चे केंद्र उभारणीसाठी पेसा कायद्याप्रमाणे ग्रामपंचायतीची परवानगी घेणे बंधनकारक असून सदर शेतीची जागा बिनशेती केल्यानंतरच एम एल व्ही चे केंद्र बांधणे अपेक्षित असतांनाही दोन्ही कायदे धाब्यावर बसवून उक्त आदिवासी भूखंडावर इमारतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची दिशाभूल करुन तसेच कायद्याचे उल्लंघन करुन संबंधीत कंपनीने एम एल व्ही केंद्र उभारणी केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच सदर प्रकरणी महसूल खात्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुसार जबाबदार दोषी कंपनीविरुध्द शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मौजे बऱ्हाणपुर येथे गट क्रमांक ३०३ खाते १२३ या आदिवासी खातेदारांच्या नावे असलेल्या भूखंडावर सदर जमिनीमध्ये रिलायन्स गॅस पाईप लाईन लि. कंपनीकडून एमएलव्ही स्टेशनचे खालीलप्रमाणे अनधिकृत बांधकाम केले होते. सदर बांधकामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
२६ X १५ X १५ चे बांधकाम
५० X ४१ चे पायाचे बांधकाम
१२ X १० X १० शेडचे बांधकाम

सदरचे बांधकाम महाराष्ट्र जमीन महसूल अनुसूचित जमातीना जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम १९७४ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधनियम १९६६ चे कलम ५९ व ४५ नुसार मंडळ अधिकारी बोईसर व तलाठी सजा बऱ्हाणपूर यांचे मार्फत निष्कासित करण्यात आले असून सदर जमिनीचा ताबा संबंधित आदिवासी खातेदार श्री. गणेश लहू तांबडा यांना देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील वेर्स्टन कोल पील्ड लिमिटेड मध्ये गैरव्यवहार केल्याबाबत.**

**(२१) १०२६६२ (१३-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील वेर्स्टन कोल पील्ड लिमिटेड मध्ये वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या साथीदारांनी कोळसा स्वच्छता प्रक्रियेत २८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले तसेच त्या चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व साथीदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०४-२०१९) :** (१), (२) व (३) केंद्र सरकारचा Coal Bearing Areas, Act-१९५७ नुसार "कोळसा" हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. सदर कायद्यातील तरतुदीनुसार उत्खनन व विक्रि ही बाब केंद्राशी निगडीत आहे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. (वे.को.ली) ही केंद्र शासनाशी निगडीत कंपनी आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार वेकोली यांना कोळसा उत्खनन क्षेत्र केंद्र शासनाने आवंटित केले आहे. त्यामुळे या प्रकरणी राज्य शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील दिव्यांग बांधवांनी प्रहार अपंग क्रांती आंदोलन तर्फे अन्नत्याग आंदोलन केल्याबाबत.**

**(२२) १०२८९१ (१३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील दिव्यांग बांधवांनी प्रहार अपंग क्रांती आंदोलन तर्फे आपल्या विविध मागण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अन्नत्याग आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दिव्यांग बांधवांच्या मागण्या कोणत्या आहेत,
(३) असल्यास, सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०४-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १. सन १९९५ च्या कायदयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करुन सर्व जि.प/म.न.पा/पंचायत समिति यांना ३ टक्के अपंग निधी तातडीने वितरीत करणे.

२. दिव्यांग बांधवांना देण्यात येणारे ६००/-मानधन वाढवून १५०० रूपये करण्यात यावे, मानधनाकरीता २१००/-असणारी उत्पन्नाची अट शिथील करुन १,००,०००/- करणे व एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक दिव्यांगांना समप्रमाणात मानधन वितरीत करणे.

३. दिव्यांगांना कर्ज माफी देवून दिव्यांग वित्त महामंडळांच्या कर्जाबाबतच्या जाचक अटी रद्य करणे, दिव्यांग-अव्यंग योजनेचे प्रोत्साहन अनुदान वाढवून १,००,०००/- करणे, सदर योजनेचा लाभ दिव्यांग-दिव्यांग विवाहास लागू करणे, दिव्यांगाचा समावेश अन्न सुरक्षा योजनेत करुन स्वस्त धान्य दुकान वाटपामध्ये आरक्षण ठेवणे.

४. केंद्र शासनाच्या सन २०१६ च्या सुधारीत दिव्यांग कायद्याची अंमलबजावणी करणे, अपंग आयुक्तालयाचे बळकटीकरण करुन नवीन ६ विभागात विस्तार करणे, रा.प.महामंडळ अंतर्गत आगार परिसरात व्यापाराकरीता दिव्यांगाना ३ टक्के आरक्षण देणे तथा जात वैधता प्रमाणपत्राच्या धर्तीवर अपंग प्रमाणपत्र पडताळणी करणे, रेल्वेत प्रवासामध्ये सवलत देणे तसेच दिव्यांग युनिक आयडी वितरण प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये करणे.

५. ज्याप्रमाणे मुंबई मध्ये सन २००५ पर्यतची अतिक्रमणे नियमाकुल करण्यात आली त्याच धर्तीवर ग्रामीण तथा शहरी भागातील सन १९९५ पासूनचे अतिक्रमण धारकांना घरकुलाचा लाभ देणे,

६. भूमीहीन शेत मजूरांना स्वतंत्र योजना सुरू करणे.

७. पालघरमध्ये राहणाऱ्या भटक्या विमुक्त जातीच्या नागरिकांसाठी असलेल्या यशवंत चव्हाण मुक्त वसाहत योजनेची प्रभावी अंमलबजावणी तथा जिल्हयातील पालघरांचे प्रस्ताव तातडीने तयार करुन त्यांना मान्यता प्रदान करणे,त्यांना रेशनकार्ड,जातीचा दाखला उपलब्ध करुन देणे.

८. पेरणी ते कापणी पर्यंत सर्व कामे म.प्रा.रो.ह.यो अंतर्गत घेणे

(३) मागण्यांमधील सामाजिक न्याय विभागाशी संबंधित मुद्ये क्र. १,२,३,४ वर कार्यवाही सुरु आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील मालमत्ता बोगस कुळमुखत्यारपत्र बनवून परस्पर विकल्याबाबत

**(२३) १०५२४२ (२०-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील प्लॉट एफ ३/१ मधील मे.एस.के.स्टील कंपनीचे सहभागीदार एस.पी.शर्मा यांचा माहे डिसेंबर, २००० मध्ये मृत्यु झाल्यानंतर त्यांच्या नावे असलेली मालमत्ता त्यांच्या पत्नीने स्वतःच्या समंतीशिवाय विकली जाऊ नये याबाबत एम.आय.डी.सी.ला सन २००६ मध्ये लेखी पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ भागिदाराचा मृत्यु झाल्यास सदर प्लॉटच्या लिजची मुदतवाढ देता येत नाही असे सहभागीदारास एमआयडीसीने कळविल्याने सहभागिदाराने माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान बोगस कुळमुखत्यारपत्र (पॉवर ऑफ अ‍ॅटॉर्नी) बनवून दहा कोटीहून जास्त किंमत असलेला ६६८५ चौरस क्षेत्रफळाचा भूखंड परस्पर मे.मार्टी फार्मा प्रा.लि. कंपनीला विकला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मृत्यु पावलेल्या सहभागिदाराच्या पत्नीने पालघर जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा निकाल देतांना न्यायालयाने एमआयडीसीचे क्षेत्रीय अधिकारी फारोख मुकादम आणि बनावट कुळमुखत्यार नुसार व्यवहार करणारे दुसरे सहभागिदार यांच्यावर गुन्हा दाखल करावा असे आदेश एमआयडीसी प्रशासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, उक्त न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करणे वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक F-३/१ या भूखंडाचे भूखंडधारक M/s Essaky Steel Rolling Mill यांचे नावावरुन सदर भूखंडाचे हस्तांतरण M/s Martis Pharma Pvt Ltd यांचे नावे केल्या प्रकरणी मा.न्यायालय, पालघर येथे दाखल केलेल्या Criminal case ३६ of २०१६ बाबत Hon Judicial Magistrate F.C. ३rd Court Palghar यांचे दिनांक ०६/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्याचे आदेश पारित केले आहेत.

(४) अद्यापही चौकशी सुरु केली नाही. कारण सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा.जिल्हा न्यायालय, पालघर यांनी सदर बाबत दिनांक २४/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे संबधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे राये (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे रिलायन्स कंपनीने पाईप लाईन टाकल्याने पिकाचे नुकसान झाल्याबाबत**

**(२४) १०६८८८ (२३-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.संजय केळकर (ठाणे):** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राये (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सर्व्हे.नं.५४/९ व ५४/२ पी.श्री.इकबाल गुलाम रब्दानी कुन्गले यांच्या सुमारे १७ गुंठे जागेत रिलायन्स कंपनीने पाईप लाईन टाकल्याने पिकाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नुकसान भरपाईची मागणी करूनही रिलायन्स कंपनीने शेतकऱ्यांस नुकसान भरपाई न देता पोलीस बलाचा वापर करून शेतकऱ्यांवर अन्याय केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार रिलायन्स गॅस कंपनीवर तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे राये स.नं. ५४/९ क्षेत्र ०.०२.८९ व स.नं. ५४/२ पै.क्षेत्र ०.१४.७६ आर जमिनीच्या वापराच्या हक्काचे संपादन पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ चे कलम ६ (४) नुसार झाले असून देय असलेली पिकांची नुकसान भरपाई कलम १० व नियम ४ मधील तरतूदीनुसार खालील प्रमाणे वाटप केली आहे.

| स.नं | कलम ६ (४) नुसार Rou संपादन | नुकसान भरपाई अदा केलेले जमीन कसणार |
|---|---|---|
| ५४/९ | ०.०२.८९ | इकबाल गुलाम रब्बानी कुन्गले |
| | | गुखत्यार रब्बानी कुंगले |
| ५४/२ पै | ०.१४.७६ | कय्युम गुलाम रब्बानी |
| | | मोह. हफरगुद्दीन अंसारी |

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे निमगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील खेड विशेष औद्योगिक क्षेत्र संपादनातून वगळण्याबाबत**

**(२५) १११०८४ (१९-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निमगाव (ता.खेड, जि.पुणे) खेड विशेष औद्योगिक क्षेत्रातील संपादित झालेल्या गट न.३५७ व गट न.४१३ पैकी काही क्षेत्र हे देवस्थान च्या मालकीचे धार्मिक क्षेत्र तसेच लोकवस्तीचे क्षेत्र आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त देवस्थानचे व लोकवस्तीचे क्षेत्र हे संपादनातून वगळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी मा.मंत्री, उद्योग यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०४-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मौजे निमगाव येथील गट नं. ३५७ व ४१३ हे क्षेत्र देवस्थानच्या मालकीचे नसून सरकारी आहे.मात्र त्यावर लोकवस्ती आहे हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर गट नंबरची समक्ष स्थळ पाहणी केली असता सदर गटावर लोकवस्तीचे क्षेत्र आहे.मात्र सदर जमीनीचा ताबा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ७/१०/२००८ रोजी प्राप्त झालेला असल्याने सदर जमीनीचा महामंडळाने केईआयपीएल कंपनीस ९५ वर्षाचे Lease Agreement करून ताबा दिलेला आहे. प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने गट नं. ३५७ व ४१३ चे क्षेत्र वगळता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूरच्या उद्योग विस्तारासाठी नवीन एमआयडीसी उभारण्याबाबत**

**(२६) १११९२८ (२३-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात गोशिमा, स्मॅक आणि मॅक अशा तीन एमआयडीसी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्याच्या उद्योग विस्तारासाठी नवीन एमआयडीसीची गरज असल्याने सदर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने कोल्हापूरचे उद्योजक केसुर्डी, ता. खंडाळा एमआयडीसी ला प्राधान्य देत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०४-२०१९) : (**१) हे खरे नाही.

गोशिमा, स्मॅक आणि मॅक या उद्योजकांच्या संघटना आहेत.

(२) कोल्हापूर जिल्हयाच्या उद्योग विस्तारासाठी नवीन एम.आय.डी.सी. ची गरज आहे. मात्र सदर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने कोल्हापूरचे उद्योजक केसुर्डी, ता.खंडाळा एमआयडीसीला प्राधान्य देत आहेत हे ही खरे नाही. कोल्हापूर जिल्हयात एकूण ६ औद्योगिक वसाहती असून त्यांचे एकूण क्षेत्र १३०५.७९ इतके आहे. त्यापैकी ११९३.५७ हे. आर. इतक्या क्षेत्राचे विविध उद्योगधंदयासाठी वाटप करण्यात आलेले असून अद्याप ११२.२२ हे. आर क्षेत्र वाटपासाठी उपलब्ध आहे. यापूर्वी अधिसूचीत केलेले भुदरगड, करवीर व शाहुवाडी येथील भूसंपादनास शेतकऱ्यांच्या प्रखर विरोधामुळे औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही .

कोल्हापूर जिल्हयातील एकूण सहा औद्योगिक क्षेत्रापैकी शिरोली औद्योगिक क्षेत्र, गोकुळ शिरगाव औद्योगिक क्षेत्र, कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र, हलकर्णी औद्योगिक क्षेत्र व आजरा (छोटे) औद्योगिक क्षेत्र या औद्योगिक क्षेत्रातील ८० टक्के पेक्षा जास्त भूखंड वाटपाची कार्यवाही झालेली असून उर्वरित भूखंडाचे निवीदा पध्दतीने वाटपाची कार्यवाही सूरू असून त्याखलील क्षेत्र ११.०२ हे. आर आहे. तसेच गडहिंग्लज क्षेत्रामध्ये १०१.२० हे. आर क्षेत्रावर नव्याने भूखंड निर्माण करण्यात आलेले असून सदर भूखंडाचे वाटप सरळपध्दतीने (ऑन लाईन सुविधेमार्फत) सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतकरी उत्पादक कंपन्यांना शासनामार्फत कडधान्य तूर खरेदी केंद्रासाठी बॅंक गॅरंटी न घेणेबाबत

**(२७) ११२७२९ (२१-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकरी उत्पादक कंपन्यांना शासनामार्फत कडधान्य तूर खरेदी केंद्रासाठी बॅंक गॅरंटी न घेणेबाबत विठु माऊली फार्मस प्रोड्युसर कंपनी लि. यांनी मा.कृषि मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास विनंती केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०३-२०१९) :** (१), (२) व (३) निवेदन प्राप्त झालेले नसल्यामुळे पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात अपंग-सुदृढ विवाह जोडप्यांना अनुदान देण्याबाबत**

**(२८) ११३१३४ (२५-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात अपंग-सुदृढ विवाह अनुदान योजनेसाठी प्रस्ताव सादर करुनही १८ अपंग सुदृढ जोडपी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनुदानापासून वंचित असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विवाहच्या दोन वर्षानंतरही त्यांना या योजनेंतर्गत अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने सदर जोडपींना निधीची तरतूद करुन तातडीने अनुदान देण्याबाबत व या जोडपींना अद्याप अनुदानापासून वंचित ठेवणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०४-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**बऱ्हाणपूर (जि.पालघर) येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर रिलायन्स गॅस पाईपलाईन कपंनीने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(२९) ११५४६६ (१९-०४-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बऱ्हाणपूर (जि.पालघर) येथील श्री.गणेश तांबडा हया आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर रिलायन्स गॅस पाईपलाईन कपंनीने अनधिकृत बांधकामे उभारली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बऱ्हाणपुर च्या गट नंबर ३०३ क्षेत्र ०.८८.५ ही जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६ ब अन्वये गणेश तांबडा व मे.रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनीला अधीन राहून रिलायन्स कंपनीने सक्षम प्राधिकरणाची अकृषक व बांधकाम परवानगी न घेता मोठे बांधकाम केले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अनधिकृत बांधकाम तहसिलदार, पालघर यांनी जमीनदोस्त केले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त अनधिकृत बांधकाम करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

मौजे. बऱ्हाणपूर, ता. पालघर येथील गट क्रमांक खाते १२३ या आदिवासी खातेदारांच्या नावे असलेल्या भूखंडावर सदर जमिनीमध्ये रिलायन्स लि. कंपनीकडून एमएलव्ही स्टेशनचे अनधिकृत बांधकाम केले आहे. त्याअनुषंगाने जमिनमालक श्री. गणेश तांबडा व रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनी लि. यांना दि. १४/१२/२०१७ रोजी अनधिकृत बांधकाम स्वखर्चाने दि. १८/१२/२०१७ पर्यंत दूर करणेबाबत नोटीस देण्यात आली होती. तथापि, त्यांनी सदर बांधकाम विहीत मुदतीत दूर न केल्याने सदरचे बांधकाम महाराष्ट्र जमिन महसूल अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम १९७४ तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५९ व ४५ नुसार मंडळ अधिकारी, बोईसर व तलाठी सजा बऱ्हाणपूर यांचेमार्फत तहसिलदार, पालघर यांनी दि. १८/१२/२०१७ रोजी निष्कासित केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अर्नाळा (जि.पालघर) येथील गरीब दिव्यांगांना निधी मिळण्याबाबत

**(३०) ११८६९१ (२३-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध ठिकाणी विशेषत: अर्नाळा (जि.पालघर) येथील गरीब दिव्यांग निधीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अर्नाळा ग्रामपंचायत निधी वाटपातही अपंगांमध्ये पक्षपात करीत असून अपंगांमध्येच फूट पाडून भांडणे लावणाऱ्या आणि गावातील वातावरण कलुषित करणाऱ्या तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी अपंग कल्याणकारी संस्थेने वरिष्ठ प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच दिव्यागांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०४-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही. मागणीनुसार पात्र लाभार्थ्यांना तीन चाकी सायकल, कुबडया, शिलाई मशीन व घरदुरूस्ती अर्थसहाय्य देण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालयावर सुकाणू समितीच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत शंखध्वनी मोर्चा काढल्याबाबत

**(३१) १२०१३३ (०४-०८-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी करावी यासह विविध मागण्यांकरीता दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर सुकाणू समितीच्या कार्यकर्त्यांनी शंखध्वनी मोर्चा काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१९) :** (१) होय.
(२) उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दि. १९.०५.२०१८ च्या पत्राद्वारे सदर निवेदन स्वीय सहायक, मा. मुख्यमंत्री यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर केले आहे.

या निवेदनातील मागण्यांपैकी कर्जमाफी हा मुद्दा या विभागाशी संबंधीत असून सद्यस्थितीमध्ये दि. १५.०३.२०१९ अखेर ४३.१२ लाख खातेदारांना रु. १८,१२४.६४ कोटी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत लाभ देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला उर्जितावस्थेत आणण्याबाबत**

**(३२) १२१६४२ (०२-०८-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखाने आणि उद्योजक यांच्या सुमारे ८७१ कोटी रुपयांच्या थकबाकीमुळे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक तोट्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेच्या निव्वळ तोट्यात सात कोटी रुपयांची भर पडली असून माहे मार्च, २०१८ अखेर बँकेचा ६८ कोटी ९१ लाखांचा निव्वळ तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०४-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मार्च २०१८ अखेर बँकेच्या बिगरशेती कर्जाची थकबाकी मुद्दल रू. ४८१.१८ कोटी व येणे व्याज रु. ३७२.०७ कोटी असे एकुण ८५३.२५ कोटी इतके आहे. त्यापैकी साखर कारखाने यांच्याकडे रु. ७२८.९० कोटी व अन्य उद्योगाकडे रु. २२.५३ कोटी थकबाकी आहे.

थकबाकी असणारे साखर कारखाने :

१. श्री. शंकर सह. सा.का. लि. सदाशिवनगर
२. बबनरावजी शिंदे शुगर अँड ऑलाईड इंडस्ट्री तुर्क पिंपरी
३. सांगोला तालुका सह. सा. का. लि. वाकी शिवणे
४. श्री. संत कुर्मदास सह. सा. का. लि. पिंपळदरा
५. श्री. स्वामी समर्थ सह. सा. का. लि. दहिटणे
६. श्री. संत दामाजी सह. सा. का. लि. मंगळवेढा
७. संतनाथ सह. सा. का. लि. वैराग
८. श्री. संत शिरोमणी मारुती महाराज सह. सा. का. लि. बेलकुंड
९. निनाईदेवी सह. सा. का. लि. करंगळी
१०. विठ्ठल कार्पोरेशन लि. म्हैसगाव
११. सिद्धनाथ शुगर मिल्स प्रा. लि. तिऱ्हे
१२. इंडियन शुगर टेंभूर्णी द्वारा/- इंडी कर्नाटक
१३. शिवरत्न उद्योग प्रा. लि. अकलूज द्वारा/विजय शुगर प्रा.लि. करकंब
१४. आर्यन शुगर प्रा. लि. खामगाव
१५. ज्ञानेश्वर मोरे शुगर प्रा. लि. पटवर्धन कुरोली
१६. आदित्यराज शुगर प्रा. लि. हत्तीज
१७. गोविंदपर्व अॅग्रो प्रा. लि. कोर्टी

थकबाकी असणाऱ्या सुत गिरण्या :

१. शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. पिसेवाडी अकलूज

२. शरद शेतकरी सह. सुत गिरणी लि. नान्नज

थकबाकी असणाऱ्या इतर खाजगी संस्था :

१. नक्षत्र डिस्टलरी अॅण्ड प्रिव्हरीज प्रा.लि. अनगर

२. मंगळवेढा कडबा ड्रायफ्रुटर कार्पो. मरवडे

(२) बँकेचा मार्च २०१७ अखेर तोटा रु. ६१.५५/- कोटी इतका होता व मार्च २०१८ अखेर रु.२७.५५/- कोटी झालेला आहे. बँकेस एकुण तोटा रु. ८९.१०/- कोटी इतका आहे.

(३) बँकेला उर्जितावस्थेत आणणेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. बँकेच्या ठेवीत वाढ होण्यासाठी व थकबाकी वसुलीसाठी सर्व कर्मचाऱ्यांना उद्दिष्ट देण्यात आलेले आहेत. सदर कामाच्या प्रगतीचा आढावा नियमितपणे घेऊन त्यांसंबंधी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. बँकेच्या मार्च २०१७ अखेर ठेवी रु.२२२५.८६ कोटी वरुन मार्च २०१८ अखेर रु.२३३०.८ कोटी इतकी झालेली असून ठेव वृद्धी ५ % नी झालेली आहे. तसेच जून २०१६-१७ अखेर बँकेची कर्ज वसुली ३२.०८ % होती त्यात वाढ होऊन सन २०१७-१८ अखेर ४३.८७ % इतकी कर्जवसुली झालेली आहे.

२. नॉनफंड व्यवसाय वृद्धीसाठी बँकेच्या ग्राहकांना आरटीजीएस, एनईएफटी, ई कॉमर्स, आयएमपीएस अशा सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

३. एसएलआर ची गुंतवणुक सरकारी कर्ज रोख्यात करून त्याद्वारे उत्पन्न वाढ अपेक्षित आहे.

४. बँकेचे निव्वळ उत्पन्न मार्च २०१७ अखेर रु.२५३.४१ कोटी वरून मार्च, २०१८ अखेर रु.२६६.५५ कोटी इतके झालेले आहे. एकुण उत्पन्नात रु.१३.१४ कोटीने वाढ झालेली आहे.

५. बँकेच्या थकबाकी वसुलीसाठी खालील उपाययोजनांचा समावेश आहे -

I. थकबाकी वसुलीसाठी विविध न्यायालयात संबंधीत संस्थांविरुद्ध ४१ दावे दाखल करण्यात आलेले आहे.

II. सहभाग योजने अंतर्गत कर्ज वितरण केलेल्या संस्थावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडुन ५ कारखान्याविरोधात सरफेशी कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. सरफेशी कायदा २००२ अंतर्गत वरीलपैकी एका उद्योजक संस्थेकडील थकबाकी रु.१८०.५५/- लाख ऑगस्ट २०१८ मध्ये वसुल झालेले आहे.

III. शेती कर्ज थकबाकी सक्तीच्या मार्गाने वसुलीसाठी एकुण १८ वसुली अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे, त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कलम १५६ नुसार वसुलीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असुन, त्यांच्या कामकाजाचा आढावा वारंवार घेण्यात येत आहे.

IV. थकबाकीची मागणी नोटीस नुसार कालावधी संपल्यावर सक्तीच्या मार्गाने वसुली करणेसाठी वसुली अधिकाऱ्यांसाठी तज्ञामार्फत मार्गदर्शन कार्यशाळा घेतलेली आहे.

V. बँकेच्या बिगरशेती कर्ज विभागासाठी संस्थाचे प्रभावी वसुली होणेसाठी मा.प्रशासकीय सभा क्र.८ ठराव क्र.२८ दि. १.०८.२०१८ अन्वये ठरल्याप्रमाणे संबंधीत संस्था विरोधात इन्सॉलव्हन्सी अँड बँक्रप्शी कोड २०१६, कलम ७ अंतर्गत मा.एनएसीएलटी न्यायालयात अर्ज दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या बोंडअळीच्या अनुदानातून बँकांनी कर्जवसुली न करण्याबाबत**

**(३३) १२२८८६ (०२-०८-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बोंडअळीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी ६ हजार ८०० रुपये मदत जाहिर केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना दिलेल्या बोंडअळीच्या अनुदानातून बँकांनी कर्जवसुली करु नये असे निर्देश शासनाने बँकाना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी किती बँकानी अनुदानातून कर्जवसुली केली असून, आतापर्यंत शासनाने किती शेतकऱ्यांना अनुदान वाटप केले वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०४-२०१९) :** (१) होय,

(२) होय,

दिनांक १७.०३.२०१८ च्या शासन निर्णयात याबाबत स्पष्ट तरतूद केलेली आहे.

(३) बँकांनी अनुदानाच्या रकमेतून कर्ज वसूली केल्याबाबतची कुठलीही तक्रार जिल्हा उपनिबंधक कार्यालय, औरंगाबाद तसेच सहायक निबंधक कार्यालय, पैठण यांना प्राप्त झाली नसून तहसिलदार कार्यालय पैठण यांच्याकडून देखील सदर तक्रारीबाबत अवगत करण्यात आलेले नाही.

तसेच तहसिलदार कार्यालय, पैठण यांचे कडून आतापर्यंत ५९,३९२ शेतकऱ्यांना रु. ३७.५०/- कोटीचे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नवलाख उंब्रे (ता.मावळ, जि.पुणे) येथील सर्व्हे क्र.४७ व ४८ जमिनीबाबत**

**(३४) १२३५७९ (०३-०८-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नवलाख उंब्रे (ता.मावळ, जि.पुणे) येथील सर्व्हे क्र.४७ व ४८ जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूसंपादनासाठी घेतलेले जागेत वारस खातेदारांचा घोळ असल्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.उद्योगमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-०३-२०१९) :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) मौजे नवलाख उंब्रे ता.मावळ, जि.पुणे येथील सर्व्हे नंबर ४७ एकूण क्षेत्र १ हेक्टर २४.६ आर पैकी सामाईकातील क्षेत्र १.१० हे. आर व सर्व्हे नं. ४८ एकूण क्षेत्र ०.६३ हे. आर पैकी सामाईकातील ० हे.१५ आर खातेदारांचे सामाईक क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार दिनांक २४/३/२०१७ रोजी संपादन करण्यात आले आहे. संपादन करण्यात आलेले क्षेत्र हे. ७/१२ वरील सर्व खातेदारांचे समाईकातील असल्याने संपादन क्षेत्राच्या नुकसान भरपाई रक्कमेस स्विकारण्यास ७/१२ वरील सर्व खातेदारांची संमती आवश्यक आहे. सदर गटातील खातेदार यांना नुकसान भरपाई स्विकारणेबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, सर्व खातेदारांची संमती दिलेली नसल्याने सदर गटातील नुकसान भरपाई रक्कम वाटप करता आलेली नाही.

---

**राज्यातील दिव्यांगावर खर्च करण्यात येत असलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३५) १२४५२५ (०२-०८-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांगासाठी ३ टक्के निधी शासनाकडून दिला जात असून, सदर निधी दिव्यांगासाठी खर्च न करताच शासनाकडे अखर्चित राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दिव्यांगावर आत्तापर्यंत शासनाने निधी खर्च केलेला नाही, अशी तक्रार दिव्यांग कल्याण समिती यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दिव्यांगांना निधी तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०४-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) अपंग कल्याण आयुक्तालयाचे पत्र दि.२७.१०.२०१७ व दि.०३.०२.२०१८ नुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना आणि दि.१६.०५.२०१८ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना तसेच दि.०५.०३.२०१८ अन्वये सर्व नगरपरिषद/नगरपालिका यांना अपंग व्यक्तींच्या कल्याणार्थ राखुन ठेवलेल्या ३ टक्के निधीची माहिती अपंग कल्याण आयुक्तालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील दिव्यांगाना शासकीय योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(३६) १२४५४२ (०४-०८-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात सन १९९५ च्या पुनर्वसन कायद्यानुसार ३ टक्के निधी दिव्यांगासाठी खर्च करण्यासह सन २०१२-१३ ते २०१७-१८ या वित्तीय वर्षात जिल्हयामधील गावातील प्रत्येक दिव्यांगाची जन्म मृत्यू नोंदणीच्या आधारावर नोंदणी करण्याची कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार दिव्यांगाना मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ देण्याकरीता जिल्हा परिषद प्रशासन निरुत्साही असल्याने दिव्यांग व्यक्ती शासकीय लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांगाना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच दिव्यांगाना शासकीय योजनेचा लाभ त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०४-२०१९) :** (१) व २) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**त्रंबकेश्वर (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांना पिककर्ज मिळण्याबाबत**

**(३७) १२७९७३ (०४-१२-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्रंबकेश्वर (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांना नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेल्या चुकीच्या नियोजनामुळे मागील दोन वर्षापासून पिककर्ज न मिळाल्याची बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांनी स्वतःजवळील पैशाद्वारे, उसनवारी करून संस्थेचे कर्ज भरले परंतु चालू वर्षात पीककर्ज वाटप थांबल्याने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनी मूक मोर्चा आंदोलन करून पीककर्जाची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१९) :** (१) नाही.

सन २०१६-१७ हंगामात सभासदांना कर्जमाफीचा लाभ न मिळाल्यामुळे सभासदांनी त्यांचेकडील पिक कर्जाची थकबाकी भरली नसल्याने सदर सभासद थकबाकीदार झाले. त्यामुळे सन २०१७-१८ व सन २०१८-१९ हंगामात कर्ज वितरण अल्प प्रमाणात झालेले आहे.
(२) नाही.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सन २०१७-१८ व सन २०१८-१९ हंगामात अल्प प्रमाणात कर्ज वसूली झाल्यामुळे सभासदांना कर्ज वितरण करण्यास अडचण निर्माण झाली . परंतु शेतकरी कर्ज मिळण्यापासून वंचित राहू नये याकरीता नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तसेच सहकार खाते यांनी राष्ट्रीयकृत बँकेमार्फत सभासदांना कर्ज उपलब्ध होणेकरीता पूर्णतः सहकार्य केलेले आहे.

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करुन दिले असल्याने शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे मूक आंदोलन केलेले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पळशी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील सावकाराने अवैधरित्या हस्तगत केलेली शेतजमीन परत मिळण्याबाबत**

**(३८) १२७९९५ (०६-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पळशी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील विधवा श्रीमती सुनिता माधव नगरधने यांच्या शेतजमीन मौजा नागापूर शेत सर्व्हे नं.२१/३ ब क्षेत्रफळ २ हे ०२ आर.व मौजा पळशी येथील शेत सर्व्हे २/६ क्षेत्र ०.४० हे.आर. ही अवैध सावकारीतून हडप केलेली शेतजमीन परत करण्यासाठी दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी सावकारांचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जिल्हा निबंधक कार्यालय यवतमाळ यांनी कार्यवाही करुन श्रीमती नगरधने यांना परत करण्याबाबत आदेशित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीमती सुनिता नगरधने यांना सुनावणीतील आदेशाप्रमाणे आजपर्यंत त्यांची हडप केलेली जमिनीचा ताबा त्यांना न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने अवैध सावकारी करून जमीन हडप करणाऱ्या सावकारांवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (१) नुसार तसेच या

प्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्याबाबत व श्रीमती नगरधने यांना त्यांची हडप केलेल्या जमिनीचा ताबा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०३-२०१९) :** (१) नाही.
(२) व (३) श्रीमती सुनिता नगरधने यांनी अवैध सावकारीबाबत केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उमरखेड यांनी चौकशी केली असून त्यांच्या दिनांक १९.७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांना अहवाल सादर केला.

सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेकडे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८(३) अन्वये सुनावणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र निर्माण करण्याबाबत**

**(३९) १२८०२७ (०४-१२-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याकरिता उद्योग संचालनालयाला जागा हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान महसूल विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्रासाठी उद्योग संचालनालयाने प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी उद्योग संचालनालयाला जागा हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०३-२०१९) :** (१) नाशिक येथे औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याकरीता पिंप्री-सय्यद येथील जागा हस्तांतरण बाबतचा ग्रामसभेचा ठराव व जिल्हा परिषदेचे शिफारस पत्र प्राप्त न झाल्याने, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सदरचा प्रस्ताव निकाली काढला आहे.

या अनुषंगाने, विषयांकित प्रश्नाबाबत विकास आयुक्त (उद्योग) यांनी दि.२९/०१/२०१९ रोजी संबंधितांची बैठक घेतली असून, केंद्रासाठी प्रस्तावित जागा शहरापासून १० ते १२ कि.मी. अंतरावर असल्याने, परिसराचा औद्योगिकदृष्टया विकास झालेला नसणे व

केंद्र उभारणी भांडवली व देखभाल खर्चाबाबत विशेष हेतू वाहन यांच्याकडे ठोस उपाययोजना नसल्याने, सद्य:स्थितीमध्ये केंद्र स्थापित करणे उचित ठरणार नाही. राज्यामध्ये प्रदर्शन व व्यापारी केंद्राबाबत नियमावली निश्चित करुन त्याचा अंतर्भाव शासनाच्या प्रस्तावित नवीन औद्योगिक धोरणात समाविष्ट करण्यात येणार असल्याने नाशिक येथे औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र स्थापन करण्याबाबत धोरण जाहीर झाल्यानतंर निर्णय घेणे उचित होईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

**शेतमाल तारण योजना न राबविणा-या बाजार समित्यांचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत**

**(४०) १२८१६७ (०४-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतमाल तारण योजना न राबविणाऱ्या बाजार समित्यांचे संचालक मंडळ बरखास्त करण्याचे निर्देश मा. पणन मंत्र्यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास पणन संचालक यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सन २०१८-१९ या वर्षातील १३८ बाजार समित्यांनी या योजनांची अंमलबजावणी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तारण योजना न राबवणाऱ्या बाजार समित्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०३-२०१९) :** (१) नाही

(२) राज्यातील १४० बाजार समित्यांनी शेतमाल तारण योजनेची अंमलबजावणी केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासींची संख्या जास्त दाखवून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४१) १२९०५२ (०७-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण १९ लाख ५० हजार आदिवासी अस्तित्वात असतांना ८० लाख आदिवासी असल्याचे दाखवून १९८१ सालापासून आजपर्यंत २ लाख कोटीपेक्षा जास्त रक्कमेचे लाभ या बनावट संस्थेद्वारे घेऊन मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणाची सीबीआयद्वारे चौकशी करण्याची मागणी धनगर आरक्षण कृती समितीचे सदस्य यांनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०४-२०१९) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील विकास संस्थेतील गट सचिवांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) १२९७०४ (०४-१२-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विकास संस्थेची संख्या २१ हजार असतानाही यासाठी केवळ ६ हजार ५०० गटसचिव सध्या कार्यरत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यात येत असून अनेक गटसचिवांकडे अतिरिक्त कारभार असल्यामुळे सदर पुरवठा करण्यात आलेल्या कर्जाची वसुली होत नसल्याने जिल्हा बँकेचे एनपीए वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे त्याचा परिणाम शेती व शेतकऱ्यांवर होत असून कामे वेळेत होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तसेच विकास संस्थेची कार्यक्षमता वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०४-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रा.वैद्यनाथन समितीच्या शिफारशीनुसार केंद्र शासन, राज्य शासन व नाबार्ड यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना सचिव नेमण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यास अनुसरून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी त्यांचे सचिव स्वतंत्ररित्या त्यांचे स्तरावर नेमावयाचे आहेत.

विविध कार्यकारी सहकारी संस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासंदर्भात राज्यातील सर्व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे सक्षमीकरणासाठी शासनाने दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला असून सदर शासन निर्णयातील निकषांची पुर्तता करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी आर्थिक वर्षात केलेल्या पिक कर्ज वाटपानुसार ०.५ टक्के ते १.५ टक्के आर्थिक अनुदान देय आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी बँकेतील प्रशासकांना मिळणारे शासकीय वेतन बंद करण्याबाबत**

**(४३) १२९८१६ (०४-१२-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे संचालक मंडळातील संख्याबळ ५० टक्क्यांनी कमी करतानाच गृहनिर्माण संस्था आणि नागरी सहकारी बँकांना झुकते माप देत राज्य सहकारी बँकेतील जिल्हा बँकांची मक्तेदारी मोडीत काढण्याचा महत्वपूर्ण निर्णय बँकेच्या प्रशासक मंडळाने घेतला असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे आजारी सहकारी बँकांच्या विलीनीकरणाचा मार्ग सुकर झाला असून त्यामुळे सहकारातील त्रिस्तरीय बँकिंग व्यवस्था मोडकळीस येण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य सहकारी बँकेत आजवर संचालक मंडळास कधीच मानधन मिळत नव्हते मात्र प्रशासक मंडळाने निश्चित केल्यानुसार प्रशासकास एक लाख ७५ हजार तर प्रशासक सहाय्यकांना १ लाख २५ हजार मासिक मानधन मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रशासकांना असणारे शासकीय वेतन बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१९) :** (१) नाही.

महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दिनांक २५.०९.२०१८ रोजीच्या वार्षीक साधारण सभेमध्ये बँकेच्या संचालक मंडळामधील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या प्रतिनिधींची संख्या १२ वरुन ७ करण्याचा निर्णय साधारण सभेने घेतला असून, संचालक मंडळामधील नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींची संख्या २ वरुन ४ करण्यात आली आहे, तसेच साखर कारखाने व सुतगिरण्यांच्या प्रतिनिधींची संख्या १ वरुन २ करण्यात आली आहे.
(२) नाही
(३) नाही.

(४) प्रशासकांना कोणतेही शासकीय वेतन दिले जात नसून सदर बँकेमार्फत मानधन दिले जाते

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांचे कृषीपंपाचे वीज बिल थकीत असलेल्या वाहिनीवरिल ट्रान्सफार्मरची दुरूस्ती न करण्याबाबत**

**(४४) १३१२७४ (०५-१२-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे कृषीपंपाचे वीज बिल थकीत असलेल्या वाहिनीवरील ट्रान्सफार्मर बिघडल्यास संबंधित शेतकऱ्यांनी बिल भरल्याशिवाय त्या ट्रान्सफार्मरची दुरूस्ती करू नये असा निर्णय महावितरण कंपनीमार्फत घेण्यात आला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी पेरणी केली असून आता पिकाला सिंचनाची गरज असतांना असा निर्णय घेण्याची प्रमुख कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हा निर्णय रद्द करण्यात येणार आहे काय, नसल्यास, सदर निर्णय रद्द न करण्याची प्रमुख कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) कृषीपंप ग्राहकांच्या अत्यल्प वसूलीमुळे थकबाकीत वाढ झालेली आहे. वीज बिलाच्या प्रमाणात वसूली नसल्यामुळे आर्थिक अडचण निर्माण होऊन वीज संनियंत्रण व देखभालीची कामे जसे की वाहिनी दुरुस्ती, नादुरुस्त रोहित्र बदलणे इत्यादीसाठी निधीची अडचण निर्माण होत आहे.

(३) दिनांक ०१.१०.२०१८ पासून देयकाच्या थकबाकीपोटी कृषीपंपाची वीज जोडणी खंडीत करण्याच्या मोहिमेस स्थगिती देण्यात आलेली आहे.

---

**रामेश्वर तांडा (ता.कळमनुरी,जि.हिंगोली) परिसरातील सालापूर येथील गावठाण सिंगल फ्युज डिपी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४५) १३१४६३ (०७-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामेश्वर तांडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) परिसरातील सालापूर येथील गावठाण सिंगल फ्युज डिपी गत सात दिवसापासून बंद अवस्थेत असून वीज पुरवठा बंद असल्याने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१८ पासून ग्रामस्थांनी गावातील मारुती मंदिरासमोर सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी, हिंगोली यांना व संबंधित अधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावात वीज नसल्याने ग्रामस्थांची दैनंदिन कामे ठप्प झाली असून शेतकरीही चिंताग्रस्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सालापूर येथील गावक-यांना सिंगल फ्युज डिपी त्वरीत उपलब्ध करुन खंडित वीज पुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे. मौजे सालापुर येथील गावठाण सिंगल फेज रोहित्र सात दिवसापासुन बंद नसुन थ्री फेज दि. २६.०९.२०१८ रोजी नादुरुस्त झाला होता. त्यामुळे ग्रामस्थांनी मा. मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा यांना दि. ०३.१०.२०१८ रोजी सामुहिक आत्मदहन निवेदन सादर केले.

(२) व (३) अंशत: खरे आहे. नादुरुस्त झालेले थ्री फ्रेज रोहित्र दि. ०५.१०.२०१८ रोजी बदलून वीज पुरवठा सुरळीत चालू करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोळींज (ता.वसई) विरार येथील सप्तर्षी सहकारी गृहनिर्माण संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(४६) १३१६७७ (०४-१२-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोळींज, विरार (ता.वसई) येथील सप्तर्षी सहकारी गृहनिर्माण संस्थेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने संस्थेच्या सभासदांनी उपनिबंधक, वसई यांचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणातील संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-०३-२०१९) :** (१) होय.

(२) सदर संस्थेतील काही सभासदांनी संस्थेतील त्रुटी संदर्भात मागणी केली असता उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अ) अन्वये संस्थेच्या दप्तराची तपासणी करण्यात आली आहे.

सदर तपासणीमध्ये संस्थेच्या कामकाजामध्ये अनियमितता आढळून आली आहे. तथापि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये संस्थेची चौकशी करण्याकरिता उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई
यांनी दि.१७.१.२०१९ रोजी आदेश दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील सिंहगड रोडवरील नांदेड येथे उच्च दाबाची वीजेची तार पडून गायीचा झालेला मृत्यु**

**(४७) १३१८७० (०७-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सिंहगड रोडवरील नांदेड येथील शेतकरी श्री.हनुमंत वाल्हेकर यांच्या गाईच्या अंगावर दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास उच्च दाबाची विजेची लोंबकळणारी तार खांबासहित पडल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडली त्या प्रसंगी शेतकरी श्री.वाल्हेकर यांनी प्रसंगावधान राखल्याने इतर जनावरांसह त्यांचेही प्राण वाचले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी सुद्धा अशा तीन घटना खडकवासला येथे घडल्या असून ज्यामध्ये निष्पाप जनावरांचे प्राण गेले असून धोकादायक खांब, विद्युत तारा, उघड्यावर असलेले डी.पी. ट्रान्सफार्मरसह तदनुषंगिक समस्या वेळेवर सोडविण्याबाबत पुणे महावितरण कार्यालयाकडे अशा घटना टाळण्याच्या दृष्टीने वारंवार लेखी पत्रव्यवहार, बैठका घेऊन सुद्धा याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) :** (१) दिनांक ३०.०९.२०१८ रोजी पुणे येथील सिंहगड रोडवरील नांदेड येथे जोरदार वादळवारा व पावसामुळे, एक झाड लघुदाब विद्युत वाहिनीवर पडल्याने त्या वाहिनीचा लोखंडी खांब वाकला व तारा तुटून खाली उभ्या असलेल्या गायीच्या अंगावर पडल्या, त्यामुळे त्या गाईला विद्युत धक्का बसून ती मृत्यू पावली.

(२) हे खरे आहे.

(३) खडकवासला मतदारसंघात दिनांक २०.०७.२०१७ व ३०.०७.२०१७ रोजी नैसर्गिक आपत्तीमुळे दोन अपघात घडले असून त्यामध्ये ३ बैलांचा मृत्यू झाला आहे. तसेच अशा घटना घडू नयेत याकरिता महावितरणमार्फत देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

पर्वती विभागामध्ये लघुदाब उपरी तारमार्ग वाहिनीला स्पेर्सस बसविण्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सदरचे काम तातडीने हाती घेण्यात येईल.

(४) गायीच्या प्राणांतिक अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणच्या विद्युत संचमांडणीमध्ये निदर्शनास आणलेल्या त्रुटींची पूर्तता महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली आहे. तसेच मयत गाईचे मालकास सदरील विद्युत अपघाताची नुकसान भरपाई रु.३१,५००/-इतकी रक्कम अदा करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) येथील ३३/११ के.व्ही. सबस्टेशनमधील वीज तसेच रोहित्राच्या अर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था करणेबाबत**

**(४८) १३२२४४ (०६-१२-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील ३३/११ के.व्ही. सबस्टेशनमधील वीज तसेच रोहित्राच्या अर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१८ रोजी मा.उर्जामंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपकेंद्रामध्ये पाण्याची उपलब्धता होत नसल्याने अर्थिंगअभावी उपकेंद्रामधील रोहित्र वारंवार बंद पडण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये एकूण ३३/११ के.व्ही.ची २७ उपकेंद्रे आहेत. त्यापैकी २४ उपकेंद्रामध्ये आर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. उर्वरित ३ उपकेंद्रापैकी ३३/११ के.व्ही.उपकेंद्र चिकलठाण येथे ग्रामपंचायत पाणी पुरवठा मार्फत अर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु पुरेसे पाणी उपलब्ध नसल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून शेजारच्या शेतकऱ्याकडून उपकेंद्रामध्ये अर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच ३३/११ के.व्ही. उपकेंद्र कात्रज येथे बोअरवेल मध्ये कमी प्रमाणात पाणी उपलब्ध असून सद्यपरिस्थितीत अर्थिंगसाठी पाण्याची व्यवस्था शेजारच्या शेतकऱ्याकडून करण्यात येते. ३३/११ के.व्ही.उपकेंद्र घोटी हे इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत उभारण्यात आले असून तेथे भूजल परीक्षणाच्या अहवालानुसार पाण्याची उपलब्धता नसल्याचे आढळून आले. तसेच ग्रामपंचायत बोअरवेल मध्ये सुध्दा पाणी उपलब्ध नसल्यामुळे अर्थिंगसाठी टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर (जि.अहमदनगर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील मोकळ्या जागा विकून करण्यात आलेला गैरव्यवहार

**(४९) १३२६०३ (०४-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर (जि.अहमदनगर) येथील कृृषी उत्पन्न बाजार समितीमधील मोकळ्या जागा विकून गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०२-२०१९) :** (१) नाही.

तथापि अहमदनगर कृषि उत्पन्न बाजार समितीमधील मोकळी जागा विकली नसून बाजार समितीचे आवारात मंजूर ले-आऊटनुसार ज्या ठिकाणी आेपन स्पेस आहे अशा जागा भाडेपट्याने देऊन नियमाचे उल्लंघन केल्याचे निर्दशनास आले अाहे.

(२) बाजार समितीच्या आवारातील मंजूर ले.आऊटनुसार आेपन स्पेस असलेली जागा भाडयाने देण्याबाबतच्या कारवाई संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी दि.०४.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी दिनांक १२.०६.२०१८ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

(३) चौकशी अहवालामध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती, अहमदनगर बाजार समितीच्या संचालक मंडळाने अनधिकृत ठराव करून गाळा व भुखंडाचे वाटप केले होते. तसेच बाजार समितीच्या आवारात मंजूर ले-आऊट नुसार ज्या ठिकाणी ओपन स्पेस आहे अशा जागा भाडेपट्टयाने दिलेल्या असून जागा वाटप करतांना बाजार समितीचे नियमांचे उल्लघंन केल्याचे तसेच बाजार समितीच्या आवारामध्ये झालेल्या अतिक्रमण विरोधात बाजार समितीने कोणतीही कायदेशीर कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम४०(ई) नुसार प्लॉट भाडेपट्टयाने देणेबाबत, बाजार समिती आवारातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम तात्काळ हटवून त्यासंदर्भातील अहवाल दोन महिन्यात सादर करण्याबाबत दि.०१.१०.२०१८ रोजी निर्देश दिले आहेत तसेच उपआयुक्त, अहमदनगरपालिका यांनी आेपन स्पेसमधील बांधकाम १५ दिवसात काढून घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाविरूध्द बाजार समितीने मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचेकडे अपील दाखल केले असून सदर प्रकरणी “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळाकडे वर्ष २०१५-१६ मध्ये १८ हजार क्विंटल तुर प्रक्रियेविना पडुन राहिल्याबाबत**

**(५०) १३४७५० (०७-१२-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाद्वारे सन २०१५-१६ मध्ये १८ हजार क्विंटल तुर खरेदी केलेली असून महामंडळाने खरेदी केलेल्या तुरीचे डाळीत रुपांतर केले नाही व तुरीचा लिलाव सुध्दा केला नाही यामुळे कीडे लागुन त्या तुरीची आता भुकटी होत असून ती काळी पडली असल्याची बाब आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकांनी माहे ऑक्टोबर महिन्यात पार पडलेल्या बैठकीमध्ये निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा निहाय यवतमाळ ६,२०० क्विंटल, धारणी १०,२०० क्विंटल, नंदुरबार १२०० क्विंटल तुर डाळ अद्यापही शिल्लक राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत सन २०१५-१६ मध्ये यवतमाळ व किनवट परिसरात ६७३२.४२ क्विंटल, धारणी परिसरात ८१५४.१८ क्विंटल व नंदुरबार परिसरात १२७६.५९ क्विंटल तूर शिल्लक आहे. सदर तुरीस वेळोवेळी धुरीकरण व औषधांची फवारणी करण्यांत येत आहे. तूर खरेदीचा कालावधी ३ वर्षावर झाल्याने तुरीला काही प्रमाणात किड लागलेली आहे. उर्वरित तुरसाठा खराब होऊ नये म्हणून धुरीकरण व किटकनाशक फवारणी वेळोवेळी करण्यात येते.

साठवणूक केलेल्या तुरीची विक्री ई-लिलावाद्वारे करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. परंतु BEP दरापेक्षा कमी दर आल्याने विक्री होऊ शकली नाही. दि.१४.०९.२०१८ व दि.२०.०९.२०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालकांनी समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव पारीत केलेला आहे. सदर समितीने अंतिम केलेल्या दराने विक्री करण्याबाबत अंतिम निर्णय घेऊन संपूर्ण तुरीची विक्री करण्यांत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.